I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 169-171 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCESS Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# ग्रामीण विकासात संत तुकाराम महाराजांच्या साहित्याचे योगदान

प्रा. बबन ब. अवघडे

मराठी विभागप्रमुख
आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन वरोरा

Communicated : 25.03.2022 Revision : 29.03.2022 Accepted : 02.04.2022 Published : 02.05.2022

भारत देशाला संत साहित्याची व ज्ञानाची परंपरा आहे. जगाच्या तुलनेत भारताची अध्यात्मिक विचारांची बैठक तथागत बुद्धांपासून संत ज्ञानेश्वर, चक्रधर, माहिंमभट, संत नामदेव, संत एकनाथ ते संत तुकाराम महाराज, अलीकडच्या काळात संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज इत्यादी. संत महात्म्यांचा विचार भारतीय साहित्यामध्ये महत्वाचा मानला जातो. सतराव्या शतकात तुकाराम महाराजांनी ग्रामीण आणि शेतीविषयक विचार मांडून ग्रामीण विकासाला प्रबळ बनवले. गत वर्षांच्या कालखंडातील संत साहित्याचा आढावा घेतला असता, हे लक्षात येते की, महाराष्ट्राच्या पावन मातीत अवतीर्ण झालेल्या संतांचा अध्यात्मिक विचार हा खऱ्या अर्थाने या देशातील मानवाला मुक्त करण्याचा विचार आहे. संत साहित्याचा विचार हा मानवी जीवन समृद्ध करणारा सर्व संतांच्या आध्यात्मिक विचारांचे अधिष्ठान मानवी जीवन समृद्ध करणाराच दिसतो. अनुरेणू पेक्षाही सूक्ष्म व व्यापक असलेल्या अध्यात्मिक व तात्त्विक विचार संत तुकारामांच्या साहित्यात दिसून येतो. भारत हा खेड्यांचा देश आहे. आणि ही खेडी सर्वस्वी शेतीवरच अवलंबून आहेत. भारतातील वातावरण, पर्जन्यमान हे शेतीला पूरक असेलच असे नाही तसेच येथील खेडे हे पारंपारिक शेतीवरच अवलंबून आहेत. या पारंपरिक शेतीतून नवा विचार शोधण्याचे कार्य संतांनी केलेले दिसते. तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत सहाशे वर्षांचा प्रदीर्घ काळ हा संत साहित्याने समृद्ध झालेला कालखंड दिसतो. महाराष्ट्रामध्ये नामदेवांपासून ते ज्ञानेश्वरांपर्यंत आणि ज्ञानेश्वरांपासून ते तुकोबारायांपर्यंत अशी संत साहित्याची वैचारिक परंपरा दिसून येते.

आपल्या देशात दोन संस्कृती नांदताना दिसतात. एक नागरी आणि दुसरी नांगरी. या दोन्ही संस्कृतीत खूप मोठे अंतर आहे. नागरी संस्कृती विद्या, ज्ञान, कला, शास्त्र लेखनासंदर्भात आहे तर नांगरी ही संस्कृती कष्टाशी, श्रमाशी निगडीत दिसते. आणि ही संस्कृती या देशातील बहुसंख्यांक लोकांची संस्कृती दिसते. दिवसभर शेतामध्ये राबराबणारी संस्कृती, जगाचा पोशिंदा शेतकरी चालवीत असतो. रक्ताच पाणी करून, हाडाची काड करायची आणि धान्य पिकवायचं. हे धान्य पिकवणीच त्याचा धर्म, त्याची संस्कृती आणि त्याचा ईश्वर असतो.मानवासोबतच या सृष्टीवरील पशुपक्ष्यांच्या उदरनिर्वाहाची काळजी देखील शेतकरी घेत असतो. अशा या कुणब्याचा,शेतकऱ्यांचा विचार संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून मांडतात. ते म्हणतात ,

''बरे झाले देवा कुणबी केले, नाहीतर दंभेची असतो मेलो /''

यातून हे लक्षात येते की, संत तुकाराम जसे शेतकरी आहेत, तसेच ते वारकरी देखील आहेत. विठ्ठल भक्तीत तल्लीन झालेले तुकाराम महाराज यांच्या अनेक अभंगातून ते शेतीचे वर्णन करतात. प्रतिमा, प्रतिकं, दृष्टांत, शेतीचे असले तरी, त्या आधारे त्यांनी विठ्ठल भक्तीचा विचार मांडला आहे. शेतातील पिकाला ते आपला विठ्ठल मानतात, आपले दैवत मानतात. त्यांच्या हृदयामध्ये विठ्ठल नामाचा गजर कायम दिसतो. विठ्ठल या तीन अक्षरामुळे त्यांच्या मनाला एक वेगळे समाधान मिळते व मन तृप्त होते. अशा रितीने संत तुकाराम महाराज यांचे शेती आणि अध्यात्माशी एक वेगळे नाते आहे. एकीकडे कृषी संस्कृतीवर प्रकाश टाकणारे विचार त्यांच्या अध्यात्मवादी रचना यातून त्यांचा कृषी विषयक विचार दिसून येतो. वारकरी संप्रदायामध्ये आजही संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्यांसमवेत विठ्ठलाच्या भेटीला पायी जाणारा वर्ग शेतकरीवर्ग आहे. विठ्ठलाचे, वारकऱ्याचे आणि शेतात बहरणाऱ्या पिकांचे एक वेगळे नाते दिसून येते. माऊलींच्या ओव्या, तुकारामांचे अभंग, पालख्यांसमवेत पंढरीकडे विठ्ठलाच्या भेटीला निघालेले वारकरी, बहुसंख्यांक शेतकरी, शेतमजूर, काबाडकष्ट करणारे आहेत. त्यांच्या विचारांचा आधार भूमी, शेती, जमीन आहे. तुकोबारायांनी ही वैचारिक

मशागत अगदी उत्तम केलेली दिसून येते. जमीन कसताना ती कशी कसावी, पेरणी कशी करावी याचाही विचार त्यांनी आपल्या अभंगात मांडलेला आहे. भूमीची 'जात–पोत' पाहूनच कोणते पीक त्यात येऊ शकते याचा विवेकाने निर्णय घ्यावा लागतो यासाठीच तुकोबांनी अनेक अभंगातून शेतीविषयक विचार मांडलेले आहेत. शेतकऱ्याचे खडतर जगणे पाहून तुकोबांचे मन हळवे होते. ते म्हणतात,

''मिरासीचे म्हूण शेत, नाही देत पीक उगे
खोल ओलीं पडे, ते पीक उत्तम
गोमट्या बीजाची फळेही गोमटी
जीवनेंविण पीक नव्हे नव्हे जाण
ओले मूळ भेदी खडकाचे अंग
न काढिता तण, कैंचे येति कण हातासी ते?''

शेतकऱ्यांना शेतीचे महत्त्व पटवून देताना ते पेरणीचा विचार मांडतात. कष्ट केल्याशिवाय पीक येणार नाही आणि जे पीक योग्य वेळी खोली आणि ओलीमध्ये पडते ते पीक उत्तम येते आणि तशाच फळाची बीजं ही उत्तम असतात. असा संदेश तुकाराम महाराज शेतकऱ्याना देतात. ते पुढे म्हणतात ,

''मढें झांकुनिया करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहे''।।

वरील अभंगावरून असे लक्षात येते की, तुकाराम महाराजांचे विचार हे वास्तववादी होते. ते अभंगाच्या माध्यमातून शेतीसोबतच लोकांच्या डोक्याचीही मशागत करताना दिसतात. पेरणीला ते महत्व देतात. कारण शेतकरी घरात व्यक्ती जरी मेला असेल तरी त्याला इतर हजारो लोकांच्या जीवाची काळजी असते. अन एका जीवासाठी रडत न बसता, इतर जीवांची काळजी घेण्यासाठी शेतकऱ्यांनी मढें झाकून पेरणी केली पाहिजे असे तुकोबारायांना वाटते. कारण वेळीच पेरणी केली नाही तर शेतकऱ्याचे पीक योग्य येणार नाही आणि म्हणून ते म्हणतात,''ओटी परीस मुठीचे वाढे'' म्हणजेच ओटीतलं बियाणं आणि मुठीतलं बियाणं या दोघांमध्ये अंतर असते. त्यात वेळेचं किती बंधन आहे याचे महत्व तुकाराम महाराज सांगतात. पेरणी करत असताना ओटीतल्या बियाण्यांमध्ये आणि मुठीतल्या बियाण्यांमध्ये आणि मातीत भिजलेल्या बियाण्यांमध्ये अंतर असते. म्हणून वेळेत पेरणी करावी असा संदेश तुकाराम महाराजांच्या अभंगातून दिसून येतो. ते म्हणतात ,

''झाडेझुडे जीव सोईरे पाषाण
शेत आले सुगी, सांभाळावे चारी कोण
पिकविले तया खाणे किती ?
घरी मोडकिया बाजा, वरी वाळकांच्या शेजा
आनंदचि अंग आनंदाचे''

पीक आल्यानंतर ते कसे सांभाळून ठेवावे हे वरील अभंगावरून लक्षात येते. शेतकऱ्यानी ''वृक्षवल्ली यांना सोयरे मानून'' त्यांचा सन्मान करावा आणि आलेले पीक, झालेली सुगी योग्य रीतीने सांभाळावी असा आदेशच जणू ते शेतकऱ्याना देतात. कारण तुकाराम महाराजांना इ. स १९५१ मध्ये पडलेले दुष्काळ त्याच्या झळा ते जाणून होते. म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना पाण्याचे आणि शेतीचे महत्त्व सांगितलेले आहे. इ. स १९५१ साली दुष्काळाने लोक त्रस्त झाले होते, ज्या लोकांच्या घरात धान्य होते, ते वर्ष लोकांनी कसेबसे काढले. पावसाचा थेंब नाही व अन्नाचा कण नाही, अशी स्थिती अनेक प्रांताची झाली. हजारो माणसे अन्न– पाण्यावाचून तडफडू लागली होती. हे जसे सर्वत्र होते, तशाच प्रकारचे आघात महाराजांच्या ही आयुष्यात आढळून येतात. तुकाराम महाराजांच्या दुसऱ्या विवाहानंतर बोल्होबा यांचे निधन झाले, त्यानंतर थोड्याच दिवसांनी आईचे निधन झाले. दु:खाची दुर्दशा संपत नव्हती त्याच वेळी काळाने सावजीच्या पत्नी वरही झडप घातली. मुळातच प्रापंचिक विरक्त असलेले सावजी तीर्थाटनासाठी निघून गेले, ते परत आलेच नाहीत. घरातील अशी एकामागून एक माणसे निघून गेली आणि दुष्काळानेही डोके आणखी वर काढले व त्या पाठोपाठ साथीच्या रोगाने ही घाला घातला. तुकाराम महाराजही या साऱ्या परिस्थितीतून चालले होते. या दु:खाचे वर्णन करताना त्यांनी आपल्या अभंगात असे म्हटले आहे की,

''न देखवे डोळां ऐसा हा आकांत।
परपीडे चित्त दु:खी होतें ।।''

वरील दु:खांचा आकांत मांडताना तुकाराम महाराज हळवे होतात. परंतु जीवनाचा सारही ते सांगायला विसरत नाहीत. कारण, दुष्काळामध्ये दम्याच्या आजाराने पहिली पत्नी निर्वतली, पत्नी पाठोपाठ दुसरा मुलगाही गेला. या दु:खातून सावरण्यासाठी ते म्हणतात,

''दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान। स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली।।
लज्जा वाटे जीव त्रासलों या दु:खें । बेबसाय देखे तुटी येतां ।।''

शेती हा संत तुकाराम महाराजांच्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय दिसतो. शेतीच्या बाबतीत अक्षरश: असंख्य तपशील त्यांनी शेती करण्याच्या स्वानुभावातूनच सांगितलेले दिसतात. शेती करणाऱ्यांसाठी त्यांनी आपले स्वअनुभव पुन्हा पुन्हा अभंगाच्या माध्यमातून सांगितले आहेत. सोबतच शेतीमधील अनुभव सांगता सांगता ते

जीवनाचा अर्थही सांगतात. तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रातून उपयोगी पडणारी व्यापक मार्गदर्शक तत्त्वे, मूल्ये विपुल प्रमाणात आपल्या हाती देताना दिसतात. पिकाची राखण करण्यासाठी शेतकऱ्यानी किती काळजी घ्यावी याविषयी ते एका अभंगात म्हणतात,

''सेत आले सुगी सांभाळावे चारी कोण । पिका आले परी केले पाहिजे जतन ।।१।।
सोंकरी सोंकरी विसावा तोवरी । नको खाऊ उभे आहे तों ।।२।।
गोफणेसी दिंडी घाली पागोऱ्याच्या नेटें । पळती हाहाकारें अवघी पाखरांची थाटे ।।३।।
पेटवूनि आगटी राहे जागा पालटूनि । पडिलिया मान बळ बुद्धी व्हावी दोनी ।।४।।
खळे दाने विश्‍व सुखी करी होता रासी । सारा सारुनिया ज्याचे भाग देई त्यासी ।।५।।
तुका म्हणे मग नाही आपुले कारण । निज आले हातां भूस सांडिले निकण ।।६।।''

तुकाराम महाराज हे शेतकऱ्याना सदैव जागरूक व सावध राहण्याचा सल्ला देतात. हा अभंग शब्द रचना आणि आशय या दोघांच्या विलक्षण लावण्याने नटलेला आहे. आपले जीवन सुखी समाधानी व यशस्वी करू इच्छिणाऱ्या सर्वच मानवांच्या दृष्टीने तो मांडला आहे. एखाद्याने अपार कष्ट करून, एखाद्या सुंदर गोष्टींची निर्मिती केली आणि तिचे रक्षण नाही केले तर निर्माण केलेलं सगळं गमावून बसण्याची वेळ निर्मात्यावर येते. तसं घडू नये म्हणून तुकाराम महाराजांनी अत्यंत तळमळीने वरील अभंगात सोंकरीला चार गोष्टी सांगितलेल्या आहेत. सोंकरी म्हणजे राखण करणारा, मशागत करून खोल ओलीला बी टाकणारी पेरणी करून योग्य वेळी पुन्हा पुन्हा पाणी देऊन तण काढून पिकांची सर्व प्रकारे काळजी घेतल्यानंतर पीक कणसांनी भरून येतं आणि ते कणसं दाण्यांनी काठोकाठ भरून येतात आणि असं काठोकाठ भरलेले पीक पाहून शेतकऱ्याचा ऊर अभिमानाने भरून येतो आणि सुगी झाल्यावर शेतकऱ्याच्या घरी सुख समृद्धी नांदू लागते. असं वाटून पुढच्या वर्षभरात काय काय करायचं याचे मधुर स्वप्न शेतकरी पाहतो. हे मधुर स्वप्न पाहण्यासाठी आणि घरात सुख समृद्धी पिकाच्या माध्यमातून येण्यासाठी शेतकऱ्यानी कायम सतर्क आणि सावधान राहिले पाहिजे. आणि हीच ती वेळ असते की शेतकऱ्यांनी उभ्या पिकांचे रक्षण केलं पाहिजे. थोडा जरी निष्काळजीपणा केला तर डोळ्यासमोर उभं राहिलेलं पीक काही क्षणात नष्ट होण्याची भीती असते. म्हणून शेतकऱ्यांनी सुगीवर आलेले पीक चारही कोपऱ्याने शेतीची राखण केली पाहिजे. ते सर्व बाजूंनी सांभाळलं पाहिजे. ते म्हणतात,

''सोंकरी सोंकरी विसावा तोवरी । नको खाऊ उभे आहे तों ।।''

या अभंगात नाद माधुर्य जितकं हृदय आहे तितकंच त्याचं अर्थ सौंदर्य मनोज्ञ आहे. जोपर्यंत पीक शेतात उभं आहे तोपर्यंत पिकाची काळजी घेतली पाहिजे. जोपर्यंत पीक धान्याच्या रूपात शेतकऱ्याच्या घरात येत नाही तोपर्यंत शेतकऱ्यानी विसावा घेऊ नये. कारण पुढील जीवन सुखकर करण्यासाठी शेतकऱ्यांनी पिकांची काळजी घ्यावी असं ते अभंगातून मांडतात. शेतकऱ्यांच्या हातात गोफण देऊन पाखरांपासून व चोर लुटारूंपासून शेताचं संरक्षण करावं लागतं. अशावेळी बळाचाही वापर करावा लागतो असे तुकाराम महाराज म्हणतात. यातूनच शेतकरी सगळ्यांचा पोशिंदा बनू शकतो. कारण तत्कालीन परिस्थितीमध्ये त्या शेतीवर बलुतेदार अलुतेदार, अतिथी यांनाही त्याचा वाटा द्यावा लागत असे. त्यांची देखील सुख–समृद्धी या शेतकऱ्यांच्या वाट्यांमध्ये असते. म्हणून शेतकऱ्याना जगाचा पोशिंदा असे आपण म्हणतो. आणि जगाचा पोशिंद्यासाठी संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून आणि संत तुकडोजी महाराज ग्रामगीतेतून शेतकऱ्यांना उपदेश करतात.

**संदर्भ :**

आ. ह साळुंखे,''तुकारामाचा शेतकरी'',लोकायत प्रकाशन, सातारा.
जगद्‌गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा गाथा, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू, पुणे,२०१३
श्री तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा, व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, दुसरे पुनर्मुद्रण,१९९१.
आ.ह.साळुंखे,''विद्रोही तुकाराम,''लोकायत प्रकाशन, सातारा.
आ.ह.साळुंखे,''बळी वंश,''लोकायत प्रकाशन, सातारा.
आ.ह.साळुंखे,''तथागत बुद्ध आणि संत तुकाराम'', लोकायत प्रकाशन, सातारा.
जाधव रमेश,''तुकाराम महाराजांच्या अभंगातील शेतकरी,'' दैनिक लोकमत,दि.२५.०६.२०२०